**दिनांक ०४/०९/२०२३**

## अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०३/०९/२०२३ चे ००.०१ ते २४.०० वा.

दुखापत

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बडनेरा अप नं. ३२४, ५०४, ५०६ भादवी | बडनेरा | दि. ०२/०९/२३ चे २३.०० वा दि. ०३/९/२३ चे ०२.१० वा | एक महीला | आकाश हिवराळे रा बडनेरा | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फि हे घरी हजर असतांना आरोपी हा घरासमोर शीवीगाळ करित होता फि ही घराच्या बाहेर आले असता आरोपी ने फिर्यादीला दारु पिण्याकरिता पैसे मागीतले फि ने पैसे देण्यास नकार दिला असता शिवीगाळ केली व तुम्ही येथे राहु नका, तुम्ही येथुन निघुन जा अशी धमकी दीली फि च्या मुलाने आरोपीस समजाविले अशता आरोपी ने फि चे मुलाला शिवीगाळ करुन थापडांनी मराहान केली व फिर्यादी चे डोक्यावर लोंखडी कड्याने माराहन केली . अशआ फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडीकल सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे राजापेठ अप क्र ८०६/२३ कलम ३२६,५०४ भादवी | राजापेठ पुलाचे खाली राजापेठ अमरावती | दि ०२/०९/२३ चे १५.३० वा दरम्यान दाखल दि ०३/०९/२३ चे १६.५६ वा | सुधिर भिमंरावजी मोहड वय ४५ वर्ष रा.शिवाजी नगर अमरावती | गब्बर उर्फ गणेश कुरोटीया वय ४७ रा.अमरावती | हकीगत अशा प्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठीकाणी फिर्यादी आपले दुचाकी ने नातेवाईकासह जात असताना राजापेठ अंडरपास पुलाजवळ गर्दी दिसल्याने थांबले असता यातील नमुद आरोपी फि.जवळ आला आरोपी ने फि.ला विचारले की तु येथे का थाबला असे म्हणुन शिवीगाळ केली व असे म्हणुन त्याचे हातातील लोखडी रॉडने फि.चे कानाचे मागे डोक्यावर मारून गंभीर जख्मी केले अशा फी चे जबाणी रिर्पोट वे मेडीस्ट्टी वरून व व.पो.नि.सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | राजापेठ अप क्र ८०७/२३ कलम ३२४,५०४.५०६ भादवी | अग्रवाल धरमकाटा एम आय डि सी अमरावती | दि.०३/०९/२३ चे १४.३० वा दि. ०३/०९/२३ चे २०.०५ वा | अभिजीत प्रमोद बुराडे वय २६ रा. मराठा कॉलणी अमरावती | अक्षय सुनील चौरागडे वय २५ रा जनता कॉलणी कुंभारवाडा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे यातील नमुद घटना तावेळी व ठिकाणी फिर्यादी हे कामावरुन घरी परत जात असतांना यातील नमुद आरोपी हा अग्रवाल धरमकाटा येथे थांबला होता त्याने फिर्यादीला दारु पिण्यास पैसे मागीतले फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्या असता आरोपीने शिवीगाळ करुन पाहुन घेण्याच्या धमक्या दिल्या. तसेच आरोपीने रोडच्या कडेला पडलेला विटाचा तुकडयाने फिर्यादीच्या डोक्यात मारुन जखमी केले. आरोपी तेथुन पळुन गेला अशा फियादीच्रा जबानी रिर्पोट वरुन व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## पळवुन नेणे

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पो स्टे वलगाव<br><br>अपराध क्र- 287/2023 कलम 363 भा.द.वि. | अमरावती | घ.ता.वेळ- 03/09/2023चे 01/00 वा. ते 01/30 वा.दरम्यान माहीती मिळाली – दि 03/09/2023 चे 07/00 वा दा ता वेळ –दि 03/09/2023 चे 07/43 वा | एक इसम | बिट्टू तायडे रा. अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे की, 02/09/2023रोजी रात्री 09.00वा. आम्ही जेवन वगैरे करून झोपलो. माझी नातेवाईक ही शेजारी माझी नातेवाईक हिचे घरी झोपली होती. दि.03/09/2023रोजी रात्री 01.00वा. माझी नातेवाईक ही माझे घरी आली. तीने मला सांगीतले की नातेवाईक ही लगवीला गेली परंतू बरेच वेळ झाला परत आली नाही. म्हणून आम्ही तीचा गांवात शोध घेतला मिळून आली नाही. म्हणून मी व आम्ही दोघे बेलपूरा अमरावती ेथे तायडे याचे घरी जावून चौकशी केली असता घरी मिळून आले नाहीच. अभिषेक याचा फोन न वर बरेच वेळा फोन केला परंतु तो फोन उचलत नाही. अभिषेक यानेच माझे मुलीला फुस लावून पळवून नेले आहे. त्याचेवर कार्यवाही होणे करीता रिपोर्ट देत आहे. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## विनयभंग

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पो.स्टे. वलगाव अपराध क्र- 288/2023 कलम 354,452, 504, भा.द.वि. | धनगरपुरा शिराळा ता.जि. अमरावती | गुन्हा घडला ता.वेळ दि. 03/08/23 चे17/30वादरम्याण माहीती ता.वेळ दि. 03/09/23 चे 22/10 वा दाखल ता. वेळ दि.03/09/23 चे 22/33 वा | एक महीला | 1)सुनिल उर्फ भैय्या विष्णुपंत देशमुख वय 60 वर्ष 2) हिमांशु सुनिल देशमुख वय 35 वर्ष दोन्ही रा. शिराळा ता.जि. अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की दि.03/09/2023 रोजी सांयकांळी 05/30 वा सुमारास मि घरात असतांना आमचे शेजारी सुनिल उर्फ भैय्या विष्णुपंत देशमुख वय 60 वर्ष व त्याचा मुलगा हिमांशु सुनिल देशमुख वय 35 वर्ष रा.शिराळा हे त्यांचा गोठ्य कडील दारातुन माझा घरात प्रवेश करुन घरातील बंद असलेले विहीरी चे व मोबाईलने फोटो काढत होते तर त्यांना मी म्हटले कसे कायघरात आले असे म्हटले असता त्या दोघांनी शिवीगाळ करणे सुरु केले व माझा डावा हात पकडुन ओढत होते माझा हात पकडणार सुनिल उर्फ भैय्या विष्णु पंत देशमुख हा होता व मुलगा, हिमांशु सुनिल देशमुख हा शिवीगाळ करीत होता त्या दोघांनी फोटो काढण्या चा बहाण्या ने माजे घरात प्रवेश करुन मलालज्जा निर्माण होईल अशा प्रकारे हात पकडुन ओडले त्यामुळे मला लज्जा निर्माण झाल्याने त्यांचा विरुध्द रिपोर्ट देत असुन कार्यवाही व्हावी असा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा दाखल |

## स्त्रीअत्याचार

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्ट फ्रेजरपुरा अपक्र ७१३/२०२३ कल ४९८(अ), ५०६,३४ भा.द.वी. | यवतमाळ | ०१/१२/२०११ चे१२.०० पासुन ते आजपावेतो दाखल ता वेळ<br><br>०३/०९/२३ चे २३.४५ वा. | एक महीला | १)किशोर मेश्राम अधिक ३ नातेवाईक | हकीकत अशा प्रकारे आहे की  यातील नमुद आरोपीतांनी फिर्यादीला शारिरीक  व मानसिक त्रास दिला. वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## चोरी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांदगावपेठ अप क्र.३४६ /२०२३ कलम ३७९,३४ भादवी | कठोरा गांधी रोडवरील पावडे ले आऊट जवळील शेती | दि.१०/०६/२०२३ चे १०/००वा.ते दि.०३/०९/२०२३ चे ०९/३३ वा. दा.ता.वेळ दि.०३/०९/२०२३ चे १३.३४ वा. | शिवकुमार सुनिलसिंह बैस वय ३३ वर्ष रा.राजपुतपुरा नांदगावपेठ | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की,मी समक्ष पो.स्टे.ला येवुन जबानी रिपोरट् देतो की,मी शेती व्यवसाय करीत असुन माझी चार एकर शेती कठोरा गांधी रोडवरील पावडे ले आऊट जवळ असुन शेती मध्ये सोयाबिन तुर पिक आहे.शेतात विहीर आहे.माझ्या विहीरी मध्ये १० वर्षापुर्वी मी लुबी कंम्पनीची पाणबुडी मशिन लावली होती.गेल्या जुन २०२३ मध्ये मी मकानाचे काम करण्यासाठी मोटार चालु केली होती.तेव्हा पासुन आज परत मोटारचे काम पडले नाही.दि.०२/०९/२०२३ रोजी ०२/०० वा.परत शेतात होतो.आज दि.०३/०९/२०२३ रोजी सकाळी ०९/३० वा.मी शेतामध्ये पिकांना स्पिंकरने पाणी  देण्यासाठी मोटार चालु केली तेव्हा मोटार चालु झाली नाही.मी पाईप वायर सह विहीरीतुन ओढली असता दगड बाधलेला होता.व विहीरीतील मोटार वायर पासुन कापुन कोणीतरी घेवुन गेले आहे.लुंबी कंम्पनीची मोटार कि.अ.५००० रु.ची होती.दोन ते तिन मुले सिंखाचे शेतीच्या बाजुला फिरतात.नाव माहीत नाही,त्याच्यावर संशय आहे.अशा फि च्या जबानी रि वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | नांदगावपेठ अप क्र.३४७ /२०२३ कलम ३७९,३४ भादवी | अमरावती | दि.०२/०९/२०२३ चे ०५/००वा. दा.ता.वेळ दि.०३/०९/२०२३ चे १५/४१ वा. | एक महीला | एक महीला | हकीकत अशा प्रकारे आहे की,दि .०२/०९२०२३रोजी चे ०५/०० वा.दरम्यान माझी १० ग्रॅम ची सोन्याची पोत हिला माझ्याच घराचे दाराचे समोर दाखविली व नंतर घरी ठेवुन दिली त्याच पोती सोबत कापडाच्या पॉकेट मध्ये माझ्या नातेवाईकाने माझ्या कडे ठेवण्याकरीता दिलेले ८५०० रु.नगदी व पोत घराचे समोरच्या खोलीत असलेल्या रॅक मध्ये ठेवली त्या नंतर ०८/०० वा.दरम्यान माझे नातेवाईक घरी आले तेव्हा ठेवलेली पोत व पैशाची कपडाची बॅग च्याच ठिकाणी मी माझ्या नातेवाईकाला ठेवल्याचे दाखविले त्यांनतर रात्री १०/३० वा.दरम्यान माझ्या नातेवाईकाला अचानक काही काम आल्याने मी बाहेर जावुन येतो असे मला सांगुन निघाले.मी सुद्धा त्याच्या मागे खाली उतरले व माझे नातेवाईक कामीनीमीत्त निघुन गेले.खाली गेट जवळ घर मालक या मला तेथे भेटल्याने मी त्याच्या सोबत १० मिनीट बोलले मी खाली आली तेव्हा माझे घराचे दार उघडेच होते.तेव्हा माझ्या घरी कोणीच नसुन माझे दोन्ही लहान मुले झोपलेले होते.तेव्हा आरोपी ही वर तिच्या घरी हजर होती.मी जेव्हा वर माझ्या घरी आली तेव्हा लगेच आरोपी हि घराला कुलुप लावुन बाहेर निघुन गेली.त्या नंतर मी माझ्या घरात गेली व १० ते १५ मिनीटात पोत व पैशाची कापडी बॅग ज्या ठिकाणी ठेवली होती .ती त्या ठिकाणी दिसुन न आल्याने मी घरात शोध घेतला व तसेच मी त्या बाबत मोझ्या नातेवाईकाला विचारले असता त्यांनी नाही घेतल्याचे सांगितले.माझी सोन्याची १० ग्रॅम ची सोन्याची पोत कि.अ.५०,००० रु.व नगदी ८५०० रु.असलेली कापडी बॅग माझ्या घरातुन आरोपी हिने चोरल्याचा माझा संशय आहे.अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र १०८९/२३ कलम ३८० भादवि | अमरावती | दि २९-०८-२३ चे ११-०० वा ते ०३-०९-२३ चे १३-३० वा दरम्यान<br>दि ०३-०९-२३ चे २०-२७ वा | एक महीला | अज्ञात इसम | हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फि ह्या रक्षाबंधनाकरीता रहाटगाव गेली होती व त्यांना त्याचे घरासमोर च्या महीलेचा फोन आला व घराचा दरवाजा उघडा असल्याचे कळल्यावर त्या परत घरी आल्या व त्यांना दिसले कि त्यांनी घराला कुलुप लावले होते परंतु घराचा दरवाजा उघडा होता घरात जावुन पाहीले तर त्याचे लाकडी अलमारीत प्लॉस्टीक डब्यातील लेडीज पर्स मधील ५०० रु चे नोटा असलेले ३०,०००/-रु नगदी व सोन्याची एकदाणी गहु मन्याची कि अं २७,०००/-रु असे एकुण ५७,०००/-रु चा ऐवज चोरु नेला कुणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेला.अश्या फि चे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ४ | नागपुरी गेट अम. अप क्र.४४७ /२०२३ कलम ३८० भादवी | वाहेद नगर मुशीर मस्जिस्द जवळ अम. | दि. ०२/०९/२०२३ चे २३/०० वा. ते दि. ०३/०९/२०२३ चे ६/०० वा. | शकील शाह रज्जाक शाह वय ५० रा. वाहेद नगर मुशीर मस्जिस्द जवळ अम. | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे ` की यातील फिर्यादी दि. ०२/०९/२०२३ रात्रीला जेवण करुन झोपला असता सकाळी दि. ०३/०९/२०२३ ला वेळ ६/०० वा. दरम्यान दरवाजा उघडा ठेवला होता फि. ने आपला विवो वाय ८३ मोबाईल चार्जिंगला लावुन ठेवुन आपल्या पर्समध्ये ठेवलेले नगदी ५,०००/- रु. होते. फि. च्या नातेवाईकाने सकाळी उठुन कपडे धुण्यासाठी काढले असता पर्समध्ये ठेवलेले ५,०००/- रु. व चार्जिंगला लावलेले विवो मोबाईल कि. ३०००/- रु. असा एकुण ८,०००/- रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ५ | पो.स्टे सिटी कोतवाली अप क्र ३८५/२३ कलम ३७९ भादवी | प्रतापगढ अपार्टनेंट खापर्डे बगीचा अमरावती | दि.३/०९/२३ चे ००.१५ वा सुमारास दा.ता.वेळ दि.३/०९/२३ चे ०१.०० वा | युवराज प्रकाश राठोड वय ३० वर्ष धंदा झोमॅटो डिलीव्हरी बॉय व चौकीदार रा. प्रतापगढ अपार्टनेंट खापर्डे बगीचा अमरावती | अज्ञात | हकीकरत अशा प्रकारे आहे की फिर्यादी हे मागील १० महीण्यापासुन सौक्युरीची गार्ड म्हणुन काम करतो व काही वेळात झोमटोचे काम करतो त्याचे कामाचे पैसे ४ ते ५ हजार रुपये त्याना मिळाल्याने ते त्यानी नातेवाईकाला कपाटात ठेवण्यास सांगीतले आज दि ०३.०९.२३ रोजी अंदाजे रात्री १२.१५ वा सुमारास फि. व त्याची पत्नी जेवन वगैरे करुन घरी झोपले त्यावेळी घराचे समोरील दार उघडे दिसले व काही वस्तु पडल्याचा आवाज आला तेव्हा फि. यांनी उठुन पाहीले असता एक इसम अज्ञात त्याना पळुन जाताना दिसला तेव्हा फि. यांनी पत्नीला पैश्याची पाहणी करण्याचे सांगीतले असता पर्समध्ये ठेवलेले ५०००/- रि पैकी ४०००/- रु वर्समध्ये दिसुन आले नाही पर्समधील पैसे कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले अशा फि. चे जबानी रि, वरुन व डो ो सा आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | पो.स्टे सिटी कोतवाली अप क्र ३८६/२३ कलम ३८० भादवी | फिर्यादीचे राहते घरी खापरेडे बगीचा अमरावती | दि.०२/०९/२३ चे २३.००वाते दि. ०३/०९/२३ चे ०६.०० वा चे सुमारास दा.ता.वेऴ दि.३/०९/२३ चे १०.०४ वा | चंदन केशव भारती वय ४० वर्ष रा c/o नीहान नितीन मुर्लीयार यांचे कडे भाड्याने खापर्डे बगहीचा अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी हे उपविभागीय अधिकारी तिवसा भातकुली विभागात शिपाई पदावर नोकरी करतो दि ०२/०९/२३ रोजी रात्री ११.०० वा दरम्यान परिवारासह जेवन करुन झोपले असता त्याचा vivo कंपनीचा मोबाईल व पत्नीचा मोबाईल सँमसन कंपनीचा मोबाईल, ठेवला व घराचे समोरील दार लोटुन दि ०३/०९/२३ रोजी सकाऴी ०६.०० वा दरम्यान झोपीतुन उठलो असता दोन्हा मोबाईल पलगावर दिसले नमाही व घरातील किचनमध्ये मंदीरात ठेवलेली दानपेटी दिसली नाही घराचे बाहेर येवुन पाहीले असता दानपेटी ही फुटलेली दिसली तेव्हा फि. यांचे लक्षात आले की कोणीतरी अज्ञात चोराने चोरी केली दि ०२/०९/२३ चे २३.००वाते दि. ०३/०९/२३ चे ०६.०० वा चे सुमारास अज्ञात चोराने फि. यांचे घरुन vivo v २३९ मोबाीील ज्याचा IMEI NO. ८६५००९०५८७२१५५१, ८६५००९०५८७२१५४४ ज्यात जिवो कं. टे सीम ९०७५८३७७२७ जुना वापरता कि. १८०००/- रु समसंग A३ मोबाओईल ज्याचा IMEI NO. ३५७१५३४७४६६३५५२, ३५९०२५६१४६६३५५१ ज्यात जिवो कं. चा सीम ९०७५०२६५४५ दुना वापरता कि १००००/ व देवादवऴील जमा चिल्लर ८००/- असा एकुण २८८००/- रु चा माल चोरुन नेला अशा फि. चे जबानी रि, वरुन व डो ो सा आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

## अपघात

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पो स्टे नांदगाव पेठ अप क्र. ३४५/२३ कलम २७९,३३७, ३३८ भादवी | NH६ रोड वरी अमरावती नागपुर रोडवरील ग्राम पिंपळविहीर | ०३/०९/२० २३ चे ०२.३० वा दाखल<br><br>०३/०९/२० २३ चे ०७.१२ वा | कारतिक केवलराम कामडी वय २८ रा. हुंडकेश्वर पिंपळा फाटा नागपुर | स्कॉर्पीयो गाडी क्र. MH ४० Ac ५९१६ चा चालक | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फि हे स्कॉर्पीयो गाडी क्र. MH ४० Ac ५९१६ गाडी भाड्याने करुन आपल्या परीवारा सोबत शेगावला दर्शनासाठी चालले होते यातील गाडी चालकाने वाहन खुपच वेगाने व भरधाव वेगाने चालवुन त्याचा वाहनावरील ताबा सुटल्याने वाहन डिव्हायडरवर चढुन विरुध्द दिशेने्मरावती ते नागपुर दिशेने आमचे वाहन पल्टी होवुन अपघात झाल्याने वाहनातील इसम हे काही गंभीर व काही किरकोळ जखमी झाले वरुन गाडी चालका विरुध्द गुन्हा दाखल |

# गैरकायदयाची मंडळी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बडनेरा अप नं. ६५५/२३ कलम १४३, ४२७, ५०४,५०६ भादंवि | जयहींद टॉकीज समोर जयहीद चौक नवि वस्ती बडनेरा | घ ता वेळ - दि. ०३/०९/२०२३ चे ०३.०० वा दा ता वेळ दि. ०३/०९/२०२३ चे ०६.०३ वा | विक्रम रोशनसिंग ठाकुर वय ५० वर्ष रा जयहींद चौक टॉकीज समोर जयहीद चौक नवि वस्ती बडनेरा | १)जितेन्द्र नोतानी रा बडनेरा २) इश्वरलाल हरवाणी रा अमरावती ३) अंकीत पिंजानी रा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद फि हे जय हिंद चौक बडनेरा येथे अमर हॉलीबॉसल व अमर भोजनालय दुकान सन १९६८ पासु नचालवितो सदर दुकानाचे जागेचे मालक यांना तेव्हा पासुन भाडे देत आहे. सद्या सदर जागेचे माल हे जय हींद बिल्डर्स अँन्ड भागीदारी फॉर्म चे १) १)जितेन्द्र नोतानी रा बडनेरा २) इश्वरलाल हरवाणी रा अमरावती ३) अंकीत पिंजानी रा अमरावतीयांनी नजुल शिट क्रं. १३ डि मधील प्लॉट क्रं. ५ /१ असे सन २०२३ मध्ये विकत घेतली आहे. सदर जागेचे मालकाने आम्हच्या दहा दुकान खाली करण्याबाबत म्हटल्यावरुन आम्ही सर्व दुकानादारांनी मिळुन कोर्टात केस क्रं. आरसी एस / फिंग नं. ३५८७/२०२३ रजी नं. ३५९/२०२३ प्रमाणे सदर दुकान न पाडण्याबाबत स्टे ऑर्डर घेतलेली आहे आज दि. ०३/९२३ रोजी स. ०३.०० वा फि हे घरी असतांना घराच्याबाहेर जोरजोराने आवाज येत असल्याने घराबाहेर यवुन पाहिले असता फी चे दुकानाच्या मागच्या मोकळ्या विवादीत जागेत दोन जेसीबी व २० ते २५ पुरुष व महिला बॉऊन्सर काळ्या टि शर्ट मध्ये गाड्या घेवुन उभे दिसले त्यांनी जेसबी ने माझ्या दुकानाच्या मागील बाजुल असलेल्या भित पाडली म्हणुन फि यांनी दुकानाचे आजुबाजुच्या दुकानादारांना फोन करुन बोलावले असता सर्व दुकानदार हे तेथे आले सर्वना त्यांना हटकले अशता २० ते २५ पुरुष व महिला बॉऊन्सर यांनी फि व फिच्या सोबतच्या दुकानदार यांना शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली पोलीसांना फोन लावुन पोलीस तेथे आले असता पोलासांना पाहुन २० ते २५ पुरुष व बॉऊन्सर महिला ह्या गाड्या टाकुन पळुन गेल्या त्यामुळे बाकीचे दुकान पाडायचे थांबले. १)जितेन्द्र नोतानी रा बडनेरा २) इश्वरलाल हरवाणी रा अमरावती ३) अंकीत पिंजानी रा अमरावती यांनी I २० ते २५ पुरुष व बॉऊन्सर महिला ची गैरकाद्याची मंडळी जमवुन फि चे दुकानाचे बाजुची भिंत पाडुन अं. ३०,०००/- रु. चे नुकसान केल व शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र १०९१/२०२३ कलम १४३ भादवी सहकलम १३५, ३३ यु, मपोका | पंचवटी चौक अमरावती | दि ३.९.२०२३ चे १७.३० वा ते १७.४० वा दरम्यान दि ३.९.२०२३ चे २३.३३ वा | सर तर्फे पो अम मंगेश निरंजन राउत बनं ५१६ पोस्टे गाडगेनगर अमरावती | १ अभीजीत देशमुख २ सुरेश तायडे ,३ सागर भवते ,४ राष्ट्रपाल वानखडे ५ विजय डोंगरे ६राज राउत ७ अमर भगत ८ सुनील गायकवाड सह कार्यकते रा अमरातवी | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतोवळी व ठीकानी यातील फीयादी हे पोस्टेला खुपीया मध्ये असुन पोस्टेला हजर असतांना माहीती मीळाली की काही लोक पंचवटी चौक येथे मराठा आंदोलनावर जालना येथे पोलीसांनी लाठी र्चाज केला त्याच्या निषेर्धाथ मुख्यमंत्री ,उपमुख्यमंत्री यांचा प्रतीकात्मक पुतळा जाळुन निर्दशन नारेबाजी करीत आहे असे माहीती वरून पोस्टाफ सह नमुद घतावेळी गेले असता काही लोक जोरजोराने निदर्शने देवुन पुतळा जाळत असल्याचे फी ला दुरूनच दीसले व जवळ जावुन पाहीले तर अभीजीत देशमुख जिल्हा अध्यक्ष वंचीत बहुजन आघाडी यांच्या नेतुत्वात नमुद आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी एकत्र येवुन पंचवटी चौक येथे प्रतीक त्मक पुतळे जाळुन निर्दशने व नारेबाजी केली तसेच मा पोउप आयुक्त याचे आदेशाचे उल्लघन करण्यात आले आहे वरून सदर चा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पोस्टे राजापेठ अप क्र ८०५/२३ कलम ३२६,३६४, १४३,१४७, १४८,१४९, अ, भादवी | अमरावती | दि ०२/०९/२३ चे १६.०० वा तसेच ०३/०९/२३ चे ०२.२५ वा दरम्यान दाखल ० | एक महीला | १)अनुप अग्रवाल रा.राजापेठ २)सोन्या चांदुरकर३)मनोज अग्रवाल४)विक्की थेटे +२ सर्व राहाणार अमरावती | हकीगत अशा प्रकारे आहे की नमुद घ ता वेळी व ठीकाणी यातील फिर्यादीचे नातेवाईक हा राजापेठ जवळ असताना यातील आरोपी क्रंमाक जवळ आला असता यातील फिर्यादीचे नातेवाईक यांने त्याला सोमवार को तेरी तक्रार पोलीस स्टेशन मे करता असे म्हटल्याने यातील आरोपी क्रंमाक एक यांने फिर्यादिचे नातेवाईकाचे डोक्यावर मारले व आरोपी क्रमांक दोन याने सुध्दा मारहाण केली तसेच यातील आरोपी त्यांनी एकत्र येवुन गैर कायद्याची मंडळी जमवुन तसेच घातक शस्त्र हातात घेऊन सदर फिर्यादीचे नातेवाईकाला त्यांने आणलेले व्हँगनार कार मध्ये जबरदस्ती टाकुन व त्याला घेऊन छत्रीतलाव रोडणे घेऊन जाऊन जंगलात नेऊन तेथे लोखंडी रॉडने मारहान करून फि.चे पतीला गंभीर जख्मी केले जख्मी अवेस्थेत तेथेच सोडले अश्या फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून तसेच मेडीकल सर्टिफिकेट वरून सदरचा गुन्हा वरिष्ठ पोलीस निरक्षक सा. यांचे आदेशान सदरचा गुन्हा दाखल |

## ईतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादी नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र १०९०/२३ कलम ४४८,३२३, ४२७,५०४, ५०६ भादवी | अमरावती | दि ३.९.२०२३ चे ४.०० वा<br><br>दि ३.९.२०२३ चे २१.३५ वा | एक महीला | सोहम काळोदे रा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी मी समक्ष रीर्पोट देतो की सुनील गंगाधर काळोदे रा सोलापुर यांचे घर भीवापुर नगर येथे सुनील काळोदे याचा मुलगा सोहम वय २० हा शीक्षणासाठी राहात आहे आम्ही रेगुलर घरभाडे देत असतो तर आज दि ३.९.२०२३ रोजी ४.०० वा घरात मी घरात असतांना माझे् सासरे हे मागच्या खोलीत होते सोहम काळोदे हा माझे् घरात एकदम येवुन मला म्हणाला काकु जेवाले दया तर मी काही न बोलता तो घरात मोठमोठयाने ओरडु न तुम्ही माया घरातुन निघुन जा घर खाली करा इथ राहु नका तर माझे् पती ला बोलावीले तर माझे् पती व सासरे आले तर माझे् सासरे यांना दोन लाथा मारल्या व माझे् नातेवाईकाचे तोंडावर चापटा मारल्या व मला त्याने पोटावर लाथा मारल्या व अंगावर मारण्यास धावुन आला व माझे् घरातील सामान फ्रीज गॅस जेवन भाजी व दिवान मधील कपडे खाण्यापीण्याच्या वस्तु फेकुन दिल्यामुळे ते तोडफोड केले व मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | पो.स्टं. वलगाव अपराध क्र- 289/2023 कलम 294,504 ,506,भा. द.वि. | ग्राम शिराळाता. जि. अमरावती | गुन्हा घडला ता.वेळ दि. - 3/08/23 चे18/00 वादरम्याण माहीती,ता ,वेळ दि.03/09/2023 चे 22/40 वा दाखल ता.वेळ दि. 03/09/2023 चे 23/11 वा | सुनिल विष्णुपंत देशमुख वय 60 वर्ष रा. शिराळा ता.जि. अमरावती | नरेन्द्र सदाशिव लव्हाळे 2) एक महीला दोन्ही रा. धनगर पुरा अवधुत मंदिरा जवळ शिराळा ता.जि. अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की दि. 03/09/2023 रोजी सायंकाळी 06/00 वा सुमारास ति, व माझा मुलगा हिमांशु याने गायवाडात जावुन घरी माणसांन सोबत बोलुन गायवाडातील विहीरी कडील दार उघडले असता आमचे आंगावर मारण्यासाठी हातोळी घेवुन नरेन्द्र सदाशिव लव्हाळे 40 वर्ष रा, शिराळा व एक महीला ही आली यांनी अश्लिल शिवीगाळ केली व मारण्याची धमकी दिली या वेळी नरेन्द्र माझा आंगावर आला असतांना त्या वेळी नाना जंगलाजी बागळे यांनी मला वाचविले त्यामुळे माझा जिवीतास धोका निर्माण झाला असल्याने नरेन्द्र लव्हाळे व त्यांची आई याचे विरुध्द तक्रार देत आहे कार्यावाही व्हावी अशा फिर्यादी चा जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |

**प्रोव्हिशन**

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोस्टे फ्रेजरपुरा | ७१२/२०२३ कलम ६५(फ)म.दा.का. | परिहारपुरा वडाळी अमरावती | ०३/०९/२०२३चे१८.३० वा. | ०३/०९/२०२३चे२०.३१ वा. | सरतर्फे पोहेका सुनिल सोळंके ब.न.२८९ पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती | संतोष भिमराव मोहोकार वय४६ रा.वडाळी परिहारपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पोस्टाफ सह पोस्टे हद्दीत पेट्रोलींग ड्युटी करीता असताना गुप्त बातमदाराकडुन मिळालेल्या खात्रीलायक बातमीवरुन नमुद घटनास्थळी जावुन प्रोव्ही रेड केली असता नमुद आरोपी हा दारु विक्री करीत असताना मिळुन आला त्यास पंचासमक्ष ताब्यात घेतले असता त्याच्या ताब्यातुन ७ लीटर गावरानी हातभट्टीची दारु कि.अ.१४०० रु ची मिळुन आली.सदर आरोपीचे कृत्य कलम ६५(फ)मदाका प्रमाने होत असल्याने फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |